## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी : २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स : २६९२१०२
तार : EDUTECHE e_mail :
Web :

क्रमांकः ४/आस्था/माहिती अधि. /२०११/ २१५
दिनांक : 17 मार्च MAR 2011

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषयः माहिती अधिकारी अधिनियत २००५ अंतर्गत प्रापत झालेल्या अर्जावार कार्यवाही करण्याबाबत..
संदर्भः शासन पत्र क्र. मा.अ.अ ०२११/प्र.क्र.३६/११)/तांशि-४, दि. १८/२/२०११.

उपरोक्त विषयाबाबत शासनाने संदर्भाधिन शासन पत्रान्वये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांबाबतची माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती संबंधित विभागीय सहसंचालकांनी उपलबध करुन देणे आवश्यक आहे असे या संचालनालयास कळविले आहे. सोबत शासन पत्राची प्रत जोडत आहे.

तरी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांबाबत माहिती अधिकारांतर्गत मागितलेली माहिती आपणंमार्फत संबंधितांस उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी यापुढे आपली राहील याची नोंद घ्यावी.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. २०८८
दिनांक 23 MAR 2011

(डॉ. सु. का. महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.

पृ.पत्रक्र.:- विकाऔ/माहिती अधिकार/2011/2182
दिनांक :- 25 MAR 2011

प्रति,
प्राचार्य
सर्व अनुदानित/विना अनुदानित संस्था
यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रासोबतचे शासनपत्र दि. 18-2-2011 मधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
औरंगाबाद.

प्रत:- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीव कार्यालयाच्या वेबसाइटवर अपलोड करण्यासाठी अग्रेषित. (RTI-Information)

**महाराष्ट्र शासन**

क्र. माअअ-०२११/(प्र.क्र.३१/११)/तांशि-४
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०११.

प्रति,
संचालक (तंत्रशिक्षण),
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय : माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर कार्यवाही करण्याबाबत

दिनांक १८.०२.२०११ रोजी मा. राज्य माहिती मुख्य आयुक्त यांच्याकडे झालेल्या सुनावणीदरम्यान असे निदर्शनास आले आहे की, तंत्र शिक्षण संचालनालयात माहिती अधिकाराखालील प्राप्त अर्जांवर व शासनाकडून तंत्र शिक्षण संचालनालयाला आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविलेल्या अर्जांवर वेळेवर कार्यवाही होत नाही. तंत्र शिक्षण संचालनालयात एकच माहिती अधिकारी आहेत. प्रशासकीय विभागात प्रत्येक कार्यासनास ज्या प्रमाणे माहिती अधिकारी व उप विभागासाठी अपिलीय अधिकारी असतो. त्या धर्तीवर तंत्रशिक्षण संचालनालयात माहिती अधिकाराच्या संदर्भात कामाचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे असे मा. राज्य माहिती मुख्य आयुक्त यांचे निर्देश आहेत.

माहिती अधिकार अंतर्गत माहिती देण्याची कार्यवाही सुलभ व्हावी म्हणून तंत्र शिक्षण संचालनालयात खालीलप्रमाणे रचना करण्यात यावी :-

| माहिती अधिकारी | अपिलीय अधिकारी |
|---|---|
| सहाय्यक संचालक/प्रशासकीय अधिकारी यांनी त्या त्या कार्यासनाचे माहिती अधिकारी म्हणून काम पहावे. | उप संचालक/प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या कार्यासनांचे अपिलीय अधिकारी म्हणून काम पहावे. |

असे ही निदर्शनास आले आहे की, खाजगी संस्था माहिती अधिकार कायदा अंतर्गत माहिती देण्यास टाळाटाळ करतात. परंतु ज्या संस्थांना शासनामार्फत जमीन उपलब्ध झाली असेल किंवा शासनाकडून अन्य स्वरुपात सहाय्य मिळाले असेल, अशा संस्थांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू असून त्यांनी माहिती अधिकार नियम २ (ज) अंतर्गत माहिती देणे त्यांना बंधनकारक आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांबाबतची माहिती प्रामुख्याने संबंधित विभागीय सहसंचालक यांनी अर्जदारास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याची सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांनी नोंद घ्यावी.

सहसंचालक, तंत्रशिक्षण,
वि.का. औरंगाबाद
आवक क्र. 2920
दिनांक 25 MAR 2011

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
मा. राज्य माहिती मुख्य आयुक्त, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय समोर, मुंबई ४०० ०३२
प्रत पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित-विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/ नागपूर

*C:\Documents and Settings\v\My Documents\TE 4\Letter\Misc.doc*